**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ३०८/२०१४ मधील आदेश नि.क्र.४७</u>**

१. वादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला पुरावा बंद आदेश रद्दबातल करण्यात यावा याकरिता दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी प्रस्तुत प्रकरणात वारंवार गैरहजर राहिले. दिनांक ०९/०९/२०२५ रोजी वादीने चौकशीकामी वकिलांना हजर राहण्यास अडचण असल्याने नि.क्र. ४६ अन्वये मुदतीचा अर्ज दिला होता. त्यापुर्वी दिनांक ०२/०८/२०२५ रोजी वादीने नि.क्र. ४५ अन्वये पुरावा देणेकामी मुदती मागितली होती. सदरचे अर्ज एकत्रित नामंजूर करुन पुरावा बंदचा आदेश पारित करण्यात आला आहे. वादीने कथन केले की, वादीचा दावा जाहीर होवून मिळणेसाठी असल्याने पुरावा अभिलेखावर घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास तीव्र हरकत घेवून अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादीचे कथनानुसार वादी हे जाणीवपूर्वक प्रकरण लांबवित आहेत. वादीने पुर्वीही नि.क्र. ४५ चा अर्ज दिला आहे. यापुर्वीही ब–याच मुदती वादीने घेतल्या आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर व्हावा. अर्ज मंजूर करणे झालेस रु. ५०००/– कॉस्ट करण्यात यावी ही विनंती प्रतिवादीने केली.

४. याठिकाणी नमूद करणे जरुरीचे आहे की, अभिलेखाचे अवलोकन केले असता, दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणे करीता वादीचा पुरावा अभिलेखावर येणे जरुरीचे आहे. वादीने अर्जामध्ये नमूद केलेली कारणे सदरचा आदेश रद्दबातल करण्याकरिता समाधानकारक आहे. तसेच सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने वादी यांचेविरुध्द पारीत पुरावा बंदचा आदेश रद्दबातल करणे गरजेचे आहे. सदर पुरावा बंदचा आदेश रद्दबातल न केल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. सदरचे प्रकरण २०१४ मध्ये दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादीस खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. वादीने रक्कम रुपये रु.७००/– (रक्कम रुपये सातशे) प्रतिवादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने, प्रतिवादीस खर्च दिल्यानंतर त्यांचेविरुध्द पारीत पुरावा बंदचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

३. वादीने वादीस खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत द्यावी.

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे)

दिनांकः– २६/११/२०२५ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is  same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. Revati P. Bagade, $4^{th}$ Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/11/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 28/11/2025 |